महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/डीबीटी-पोर्टल/२०२०/ 1217 दिनांक : ०६.०३.२०२०

09 MAR 2020

**महत्वाचे परिपत्रक :**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित,
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूकला/एच.एम.सी.टी. /एम.बी.ए./एम.सी.ए.
अभ्यासक्रमांच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी संस्था,
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मधील महाडीबीटीवरील लाभ वितरणाच्या कार्यवाहीबाबत..
संदर्भ : संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र
जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/७९ दिनांक २८.०२.२०२०.

आपले सरकार डी.बी.टी. पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.
३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना. (भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या महाडीबीटी पोर्टलवरील उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना कळविण्याबाबत वेळोवेळी या विभागीय कार्यालयामार्फत आपणास सूचित करण्यात आलेले आहे. तसेच **"विद्यार्थी व संस्था यांनी पोर्टलवर वेळोवेळी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार आपापल्या स्तरांवरील कार्यवाही न चुकता पूर्ण करावी"** असेही कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त शिष्यवृत्तींच्या **पहिल्या हप्त्याची रक्कम प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना दुस-या हप्त्याची रक्कम** प्राप्त होण्यासाठी संस्थेच्या लॉगीनमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती भरण्यासाठी यादी प्राप्त होते. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती संस्थेकडून भरण्यात येते अशा विद्यार्थ्यांच्या **लाभाच्या दुस-या हप्त्याच्या** रकमेचे देयक पोर्टलमार्फत जनरेट करुन मंजूर देयकाची रक्कम शासनाच्या सेंट्रल पूल खात्यात विद्यार्थी / संस्था यांना वितरणासाठी जमा करण्यात येते व विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये दुस-या हप्त्यासाठीचे व्हाऊचर रिडीम करण्यासाठी उपलब्ध होते व विद्यार्थ्यांकडून ते व्हाऊचर रिडीम केल्यानंतर योजनेच्या लाभाची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित / संस्थेच्या बॅंक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते.

या पत्राद्वारे सर्व संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये लाभाच्या पहिल्या हप्त्यासाठी रिडीम बटन प्राप्त झालेले / होणार आहे अशा विद्यार्थ्यांना **त्वरीत रिडीम बटनाचा वापर करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात**. अन्यथा डीबीटी पोर्टलमार्फत लाभ वितरणाची कार्यवाही सुरु होणार नाही. तसेच, संस्थांच्या लॉगीनमध्ये **लाभाच्या दुस-या हप्त्यासाठी उपस्थिती अहवाल भरण्यासाठी** प्राप्त होत असलेल्या यादीमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती त्वरीत भरण्यात यावी. अन्यथा यामध्ये विलंबाबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

खाली दिनांक २८.०२.२०२० अखेर डिबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट नुसार या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या संस्थांमधील पहिला हप्त्याच्या रिडिम बटनाचा वापर न केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या व संस्थेकडून दुस-या हप्त्यासाठीचा उपस्थिती अहवाल न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तक्ता जोडलेला आहे. आपल्या संस्थेतील प्रलंबीत विद्यार्थ्यांची माहिती संस्थेच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असून त्यानुसार संस्थांनी आवश्यक कार्यवाही प्रथम प्राधान्याने करावी जेणेकरुन कोणतीही कार्यवाही संस्था / विद्यार्थी स्तरावर प्रलंबित राहाणार नाही व लाभ वितरणाची कार्यवाही जलद गतीने करता येईल.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**DBT Dsahboard report as on 28.02.2020**

**2018-19 and 2019-20 status of voucher not redeem and attendance pending for 2nd installment.**

| Name of Scheme | 2018-19 | | | 2019-20 | |
|---|---|---|---|---|---|
| | Voucher not redeem | Pending At institute (2nd Installment) | Voucher not redeem (2nd Installment) | Voucher not redeem | Pending At institute (2nd Installment) |
| Dr. Punjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna (DTE) | 0 | 211 | 24 | 2780 | 0 |
| Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulka Yojna (DTE) | 0 | 256 | 21 | 0 | 8179 |
| Scholarship for students of minority communities persuing Higher and Professional courses (DTE) | 0 | 173 | 9 | 0 | 0 |
| **Total:** | **0** | **640** | **54** | **2780** | **8179** |